# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024



# पंडित जोशूआ फेनबर्ग यांच्या सतार वादनाने पाटणवासीय मंत्रमुग्ध




सतारवादनप्रसंगी पं. जोशूआ फेनबर्ग व तबला वादनप्रसंगी उन्मेष बॅनर्जी.

▲ पाटण, दि. ३१ : जागतिक कीर्तीचे सतार वादक पंडित जोशूआ फेनबर्ग यांच्या सतार वादनाने पाटणमधील रसिक प्रेमींना अक्षरशः मंत्रमुग्ध करून टाकले. पं. जोशूआ यांचे सतारवादन व तबला वादक उन्मेष बॅनर्जी यांच्या जुगलबंदीने सभागृहात प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्यासह पाटणच्या दर्दी प्रेक्षकांनी या परदेशी कलाकारांना प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्तपणे दाद दिली. चौगुले ग्लोबल ग्रुप गोवा व चौगुले इंडस्ट्रीज प्रा. लि., आणि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण यांच्या सहकार्याने पाटणमधील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात अमेरिकेतील सुप्रसिद्ध युवा सतार वादक पंडित जोशूआ फेनबर्ग यांचा सतार वादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी चौगुले इंडस्ट्रीजचे चेअरमन विजय विश्वासराव चौगले, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण जॉइंट यांची प्रमुख उपस्थित होती.

पंडित जोशूवा फेनबर्ग यांच्या सतार वादनाची सुरवात बसंत बहार या रागाने झाली. रात्रीच्या शेवटच्या प्रहरी गायला जाणारा हा राग वसंत ऋतुकाळात कधीही गायला जातो. या रागदारीने चैतन्य शक्तीचा संचार होतो. वातावरणात उत्साह निर्माण होतो. यावेळी त्यांनी सादर केलेल्या विविध रागातील सतार वादनामुळे उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. त्यांनी सादर केलेल्या स्वरलहरींनी सभागृहात चैतन्य निर्माण झाले होते. एक एक छेडलेली तार त्यातून निघालेला स्वर मनावर चैतन्य लहरींचा वर्षाव करत होता. शास्त्रीय संगीत वादनाच्या दर्जेदार बैठकीने खऱ्या अर्थाने पाटणमध्ये वसंत पंचमीच साजरी झाली. सतार वादनातून प्रेक्षकांना दोन तास मंत्रमुग्ध करून टाकले. यावेळी सतार वादन आणि तबला वादनाची उत्तम जुगलबंदी ऐकायला मिळाली. पाटण तालुक्याचे भाग्यविधाते विक्रमसिंह पाटणकर दादांसह पाटणच्या दर्दी प्रेक्षकांनी या परदेशी कलाकारांना प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्तपणे दाद दिली.

प्रारंभी कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणद्वारा नव्याने सुरू करण्यात आलेल्या कोयना कला अकादमीचे (गायन, वादन, नृत्य, अभिनय, चित्र) उद्घाटन चौगुले इंडस्ट्रीजचे चेअरमन विजय विश्वासराव चौगुले यांच्या हस्ते, संस्थेच्या सौ.सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळेत करण्यात आले. संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले.